संक्षिप्त वृत्त

जुगार अड्ड्यावर छापा; सहा जण ताब्यात; ५९ हजाराचा माल हस्तगत

सांगोला : तालुक्यातील महूद बुद्रुक येथील आत्तार गल्लीतील हिरा चौगुले यांच्या पत्र्याच्या बंद खोलीतील जुगार अड्ड्यावर छापा मारून ५२ पानाचा जुगार साजन खेळत असल्याचे आढळून आले व त्यांच्याकडून ५९ हजार रुपयांचा माल जप्त करून जुगाऱ्यावर गुन्हा दाखल केला आहे. ही घटना एक जून रोजी घडली. प्रशिक्षणार्थी प्रभारी अधिकारी शुभम कुमार यांना बातमीदारामार्फत महूद बुद्रुक येथील आत्तार गल्लीत हिरा चौगुले यांच्या पत्र्याच्या खोलीत जुगार खेळतात असे समजले. त्यानुसार त्यांनी कॉन्स्टेबल विजयकुमार आवटे, योगेश येवले, रामेश्वर चाटे यांच्यासह तेथे धाड टाकली. पंचासमक्ष पत्र्याच्या बंद दरवाजा उघडून प्रवेश करून गोलाकार टेबलाच्या बाजूला सहा लोक बसून मधोमध लाल रंगाचे ५२ पानी पत्ते खेळत असल्याचे दिसून आले पंचा समक्ष त्यांची नावे विचारले असता अरुण सुखदेव कंपने (वय वर्षे ५३ रा. महूद), गोविंद दत्तात्रय विभुते (वय वर्षे ४० रा. महूद), नंदकुमार शिवाजी सरतापे (वय वर्षे ४५ राहणार फळवणी ता. माळशिरस), शशिकांत साहेबराव अहिवळे (वय वर्षे २६ रा. पळशी, ता. पंढरपूर) शिवाजी तुकाराम काळेल (रा.लोणारवाडी, ता. पंढरपूर) नितीन महादेव सरतापे वय वर्षे ४३ रा. महूद) असल्याचे सांगितले. त्यांच्याकडून १८ हजार ७८० रुपये रोख, सहा मोबाईल त्याची किंमत ४१ हजार रुपये तसेच पन्नास रुपयेचा पत्त्याचा डाव असा सुमारे ५९ हजार ७८० रुपयाचा माल हस्तगत करून पंचासमक्ष जप्त केला व सहा जणांवर जुगार प्रतिबंधक अधिनियम ४.५ प्रमाणे सांगोला पोलीस स्टेशनमध्ये कॉन्स्टेबल विजयकुमार आवटे यांनी गुन्हा दाखल केला आहे.

सांगोला महामार्गावर वाहनाच्या धडकेत सायकल रायडर ठार

सांगोला : सांगोला-पंढरपूर या राज्य मार्गावरील सांगोला येथील जलशुद्धीकरण केंद्राजवळ मंगळवेढ्याचे सायकलिंग करणारे सायकल रायडर उद्योजक सुहास शशिकांत ताड (वय वर्षे ४६) यास खाजगी ट्रॅव्हल्सने पाठीमागून जोराची धडक दिल्याने जागीच मयत झाल्याची घटना दि. ३ जून रोजी पहाटे पाच ते सहाच्या दरम्यान घडली. याबाबत माहिती अशी की, मंगळवेढा येथील मोठे उद्योजक सुहास शशिकांत ताड हे दररोज मंगळवेढा सांगोला असे सायकलिंग करत होते आजही पहाटे पाच ते सहाच्या सुमारास मंगळवेढा पंढरपूर व सांगोला मंगळवेढा असे सायकलिंग करीत जात असताना दि. ३ जून रोजी पहाटे पाच ते सहाच्या दरम्यान जलशुद्धीकरण केंद्राजवळ ट्रॅव्हल्सने (एम एल-०१-बी -२३ ३२) पाठीमागून धडक दिल्याने सुहास ताड हा जागीच मयत झाल्याची घटना घडली आहे. याबाबत सांगोला पोलीस स्टेशन मध्ये सुधीर शशिकांत ताड यांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल मोहोळकर हे करीत आहेत. सदर अपघाताची प्रथम फिर्यादीत अज्ञात चार चाकी वाहनाने धडक दिल्याचे नोंद केली होती. परंतु तपासी अंमलदार मोहोळकर यांनी तातडीने इतरत्र चौकशी करण्यास सुरुवात केल्यानंतर त्यांना ट्रॅव्हल्स बसने धडक दिली असल्याची खात्रीशीर बातमी मिळाल्यानंतर त्यांनी त्वरित जत येथे जाऊन ट्रॅव्हल्स बस ताब्यात घेतले असून पुढील तपास चालू आहे. अज्ञात चार चाकी वाहनाने का ट्रॅव्हल्सने धडक दिल्याचे अद्याप स्पष्ट पोलीस सूत्रांकडून समजले नाही. तालुक्यात गेली दोन दिवसात दोन अपघात होऊन चार नागरिक मयत झाल्याच्या घटनेमुळे नागरिकांत तसेच वाहन चालकात भीतीचे वातावरण दिसून येत आहे.

रास्तारोको केल्याने तेरा जणांवर सांगोला पोलिसांची कारवाई

सांगोला : तालुक्यातील सांगोला-कडलास व जत-विजापूर या दोन राज्य मार्गावरील तसेच मान नदीवरील पुलाच्या दक्षिण उत्तर बाजूस रस्त्यावर मोठे खड्डे पडल्याने या मार्गावर सातत्याने अपघात घडत आहे. रस्त्याची दुरुस्ती त्वरित करावी अशी मागणी कडलाचे युवा नेते दत्तात्रेय टापरे यांच्या नेतृत्वाखाली रस्ता रोको आंदोलन केले म्हणून कडलास येथील तेरा लोकांवर गुन्हा दाखल करण्यात आला. यांचे विरुद्ध भादवि कलम ३४१, १४३, १४९, १८८ या संबधीताच्या विरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ प्रमाणे पोलीस कॉन्स्टेबल रमेश गौतम कांबळे यांनी सांगोला पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली आहे.

श्रीनिवास बुरा यांचे निधन



सोलापूर : श्रीनिवास बुरा (वय ६२,रा. दाजी पेठ, सोलापूर) यांचे शनिवारी (दि.१) निधन झाले. त्यांच्या पश्चात १ मुलगा, ३ मुली, नातू असा परिवार आहे. पूर्व भागातील व्यंकटेश जिल्ला पंतुलू यांचे ते सासरे आहेत.

नेत्याच्या विजयासाठी तो पाण्यावर

खर्डीतील पांडुरंगाचे पाण्यावर तरंगत देवाला साकडे!

सोलापूर/विकास चाटी

लोकसभा निवडणुकीची मतमोजणी आता अगदी जवळ आली आहे. मंगळवारी (दि.४) मतदान यंत्रे उघडली जाणार असून कोण विजयाचा गुलाल उधळणार आणि कोणाची निराशा होणार हे कळणार आहे. मात्र यात एका कार्यकर्त्याने आपल्या नेत्याच्या विजयासाठी चक्क पाण्यावर तरंगत तब्बल तासभर तरंगत पांडरंगाला साकडे घातल्याचा व्हिडिओ सोमवारी (दि.३) दिवसभर सोशल मिडीयावर धुमाकुळ घालत होता.

खर्डी (ता.पंढरपूर) येथील पांडुरंग गिनाजी रोंगे पाटील असे त्या अवलियाचे नावे ! त्याने सोलापूर लोकसभा मतदारसंघातून आ. प्रणिती शिंदे व माढा मतदारसंघातून धैर्यशील मोहिते पाटील यांचा विजय होण्यासाठी पाण्यावर तरंगण्याचा उपक्रम राबविला. त्याचे जिल्हाभरात प्रचंड कौतुक केले जात आहे.

यंदाची लोकसभा निवडणूक अत्यंत चुरशीने लढवली गेली. सोलापूर लोकसभा मतदारसंघातून आमदार प्रणिती शिंदे यांनी आपल्या वडिलांचा दोन वेळा झालेला पराभव पुसून टकायचा या इर्षेने पेटून प्रचार केला. नेहमीप्रमाणे त्या आपल्या कार्यकर्त्यांना त्यासाठी प्रेरणा देण्यातही यशस्वी ठरल्या. सोलापूर लोकसभेला महाविकास आघाडीकडून त्यांचीच उमेदवारी असणार हे माहीत असल्यामुळे त्यांनी खूप आधीपासून प्रचार सुरू केला होता. त्यांचे प्रतिस्पर्धी म्हणून राम सातपुते यांची उमेदवारी जाहीर होईपर्यंत त्यांनी प्रचाराची एक फेरी ही पूर्ण केली होती. मात्र उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आ. राम सातपुते यांनी जोरदार आघाडी उघडली. प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील गावन्गाव पिंजून काढून नेत्यांच्या सभा घेऊन त्यांनी मतदारसंघात पडलेली पिछाडी वेगाने भरुन काढली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, तेलंगणाचे नेते टी. राजा सिंह यांच्या दमदार सभा घेऊन त्यांनी मतदारांना आपल्या बाजूने ओढण्यास सुरुवात केली. सोलापूर मतदारसंघात भाजपा पिछाडीला पडला असे असलेले चित्र त्यांनी बदलून टाकले आणि प्रणिती शिंदे यांना चांगली टक्कर दिली.

दुसरीकडे माढा मतदारसंघात उमेदवार निवडीनंतर मोठे महानाट्य घडले. भाजपामध्ये बंडखोरी करून धैर्यशील मोहिते-पाटील यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाची तुतारी हातात

खर्डी : उमेदवारी विजयी व्हावे याचे साकडे विहिरीमधील पाण्यावर तरंगत राहून करताना पांडुरंग रोंगे-पाटील.

घेऊन निवडणुकीच्या रिंगणात झेप घेतली. आपल्यावर झालेला अन्याय किती मोठा आहे हे सांगून माढा मतदारसंघात त्यांनी भाजपाचे विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक - निंबाळकरांसमोर चांगलेच आव्हान उभे केले. काही काळ तर विद्यमान खासदार रणजीत सिंह नाईक निंबाळकर यांचा ते पराभव ते सांगतात करतील काय अशी परिस्थिती निर्माण झाली. परिणामी या मतदार संघातही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सभा घेऊन निंबाळकरांच्या मदतीसाठी धावत यावे लागले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनाही सभा घ्यावी लागली.

अशाप्रकारे सोलापूर जिल्ह्यातील दोन्हीही लोकसभा मतदारसंघातील निवडणका अत्यंत चुरशीने लढल्या गेल्या. मतदानानंतरही दोन्ही पक्षातील कार्यकर्ते, समर्थक आपल्या नेत्याच्या विजयाचे दावे-प्रतिदावे करत होते. वेळप्रसंगी मोठमोठ्या पैजाही लावल्या गेल्या. काही बहाद्दरांनी तर ११-११ बुलेटच्या पैजा लावल्या. एकूणच आपल्या नेत्याच्या विजयाची खात्री इतकी जास्त असल्याचे दाखवण्यासाठी कार्यकर्त्यांनी कसलही कसर ठेवली नाही.

त्यावर वरताण केली ती खर्डीच्या पांडुरंगाने. आपल्या महाविकास आघाडीच्या दोन्ही उमेदवारांच्या विजयासाठी त्याने आपल्या शेतातील विहिरीम ध्ये तरंगत योगासने करत पांडुरंगाला साकडे घातले आहे. हाती आलेल्या वृत्तानुसार त्याने एक तासानंतरही ही तपश्चर्या सुरुच ठेवली होती. आता त्याला पांडुरंगांनी हात दिला की निराश केले हे मंगळवारी मतमोजणीनंतर कळणार आहे. मात्र जेव्हापासून हा व्हिडिओ बाहेर आला आहे. तेव्हापासून सोशल मीडियावर या व्हिडिओने धूम केली आहे. आता कोण जिंकतो याकडे मतदारांचेही मोठ्या कुतुहलाने लक्ष लागले आहे.

भाळवणी येथील महाविद्यालयात सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील न्यू इंग्लिश स्कूल व जुनिअर कॉलेज ऑफ सायन्स या महाविद्यालयात सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी प्राचार्य एन. एम. गायकवाड, बी. सी. भोगले, डी. एच. यादव या सेवानिवृत्त शिक्षकांचा फेटा, शाल, श्रीफळ पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी बारावीच्या परीक्षेत अंजली लोखंडे, प्रगती शेंडे, प्रीती माळवदे, अमृता शिंदे तसेच दहावीच्या परीक्षेत प्रतीक्षा पासले, प्रणाली झांबरे, शांभवी निराळी या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन केले आहे, त्या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी एस. डी. रोकडे, एस. जी. झरे, आर. एम. दडस, के. के. जाधव, जी. डी. जमदाडे, पी. एस. जमदाडे, एस. के. काळे, पी. एच. पाटील, बी. ए. विधाते, आय. ए. कुंबरे, उत्तम शिंदे, आर. बी. झांबरे, एस. आर. जाधव, विद्यार्थी पालक शिक्षक आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

पंढरपूर : भाळवणीमधील न्यु इंग्लिश स्कुल कालेजच्या शिक्षकांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार सोहळाप्रसंगी शिक्षक व विद्यार्थी.

चुलत्याचा खून; पुतण्याचा जामीन फेटाळला

सोलापूर : वाळूज (ता. मोहोळ) येथे लहू मोटे यांचा खून केल्याप्रकरणी अटकेत असलेला मयताचा पुतण्या रामेश्वर निवृत्ती मोठे (वय वर्षे २५, रा. वाळूज) याचा अटकपूर्व जामीन अर्ज अतिरिक्त सत्र न्यायाधीश योगेश राणे यांनी फेटाळून लावला.

ता. मोहोळ, जि. सोलापूर याने व त्याचे साथीदारांनी मिळून चुलता लहु मोटे याचा खून केल्याप्रकरणीच्या गुन्ह्याकामी त्याचा जामीन अर्ज अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश योगेश राणे यांनी फेटाळला. यात हकीकत अशी की, आरोपी रामेश्वर मोटे हा मयत लहू मोटे यांचा पुतण्या असून तो वाळूज येथील अतुल गुंड यांची शेती बटाईने करीत होता. परंतु लहू मोटे यांच्या सांगण्यामुळे शेतीमालकाने सदरची शेती रामेश्वर मोटे यांच्याकडून काढून घेऊन त्रयस्त व्यक्तीस बटाईने करण्याकरिता दिली होती. त्यास कारण लहू मोटे असल्याचा संशय घेऊन घटनेच्या एक वर्षांपूर्वी आरोपी रामेश्वर मोटे याने लहू मोटे यास शिवीगाळ केली होती. त्यामुळे तो लहू मोटे याच्यावर चिडून होता. दि.९ जून २०२३ रोजी रात्री लहू मोटे व फिर्यादी किशोर मोटे हे दोघे शेतातील वस्तीवर झोपले होते. आरोपी रामेश्वर मोटे व त्याचे इतर दोन साथीदारांनी काठीने व लोखंडी गजाने लहू मोटे व फिर्यादीवर प्राणघातक हल्ला केला होता. उपचारादरम्यान लहू मोटे मयत झाले होते. या प्रकरणात मूळ फिर्यादीतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. श्रीपाद देशक, ॲड. सिध्दाराम पाटील, सरकारतर्फे ॲड. माधुरी देशपांडे तर आरोपीतर्फे ॲड. मिलिंद थोबडे यांनी काम पाहिले.

आक्षेपार्ह पोस्ट केल्यास कारवाई : सपोनी परजणे

नातेपुते : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने दि. १० मार्चपासून ते ६ जून २०२४ रोजीपर्यंत आदर्श आचारसंहिता अंमलात असून जिल्हा सोलापूरसह संपूर्ण देशभरात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा निकाल दि. ४ जून रोजी जाहीर होणार असून त्या अनुषंगाने कोणीही नागरिक सदर निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर सोशल मीडियाद्वारे फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप ग्रुप व इतर तत्सम ॲप्लिकेशनच्या माध्यमाद्वारे कोणत्याही समाजाच्या, जातीच्या, धर्माच्या भावना दुखावतील अशा स्वरूपाच्या पोस्ट, कॉमेंट्स, स्टोरी, स्टेटस, डिजिटल बॅनर असे प्रकार वरील माध्यमाद्वारे करू नयेत तसेच कोणाचेही विरोधात घोषणाबाजी करू नये, डीजे वाजवणार नाहीत, फटाके फोडणार नाहीत. तसेच विनापरवाना विजयी मिरवणूक काढू नये, असे आवाहन नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी केले आहे.

सांगोल्यात जागतिक सायकल दिन साजरा

सायकलिंग आरोग्यदायी जीवनाची गुरुकिल्ली आहे : निलकंठ शिंदे

सांगोला/प्रतिनिधी

जागतिक सायकल दिनानिमित्त सांगोला सायकलर्स क्लबतर्फे राईडचे राष्ट्रीय महामार्ग एन. एच. १६६ या मार्गावर आयोजन करण्यात आले होते. यावेळी जागतिक सायकल दिनानिमित्त युवा सायकलिस्ट नीलकंठ शिंदे म्हणाले, 'सायकलिंग आरोगदायी जीवनाची गुरुकिल्ली बनली आहे. तसेच आरोग्यदायी जीवनासाठी सायकल चालवणे हा अनेक सायकलिस्ट यांचा शिरस्ता बनला आहे. सांगोल्यातील अनेक तरुण, व्यापारी तसेच इतर क्षेत्रातील बरेच जण सायकल शर्यतीत भाग घेत आहेत त्यामुळे सांगोल्यातील सायकल शर्यतीची क्रेझ निर्माण झाल्याचे सांगितले.

पुढे सायकललिस्ट बाळासाहेब टापरे म्हणाले की, 'शारीरिक तंदुरुस्तीतून उत्तम आरोग्य सायकलचा प्रचार व प्रसार करून प्रदूषण कमी करणे व सायकलिंग हा खेळ प्रकार ग्रामीण भागात माहिती व्हावा याकरिता हा क्लब विविध राईडचे आयोजन करीत असलेचे सांगितले.'

सांगोल्यातील सर्व क्षेत्रातील सायकलिस्टने सुरुवातीस सायकल चालवायला सुरुवात केली सायकल शर्यतीची आवड निर्माण करण्यासाठी सांगोला सायकलर्स क्लबची स्थापना करण्यात आली.

आज या ग्रुपमध्ये ७८ सदस्य आहेत. ते दररोज २५ ते ३० किलोमीटरची सायकल राईड करतात. दर रविवारी ते ५० ते ६० किलोमीटरची सायकलिंग करतात यात ते प्रामुख्याने नागपूर-रत्नागिरी मार्गावर सांगोल्यापासून अनकढाळ टोल प्लाजा, नाझरा, चिनके, हातीद, जुनोनी, नागज, सोनंद, सिंगनहळी, शेगाव, जतपर्यंत सायकलिंग करतात. यामधील काही जण लांबपल्ल्याच्या राईडमध्ये सहभाग नोंदवून पर्यावरण जपण्याचा संदेश देतात. सायकलिंगची आवड निर्माण व्हावी म्हणून या ग्रुपतर्फे व्यायामाविषयी जनजागृती करण्याचे काम गेल्या तीन ते चार वर्षांपासून सुरू आहे.

यावेळी सांगोला शहराजवळ घडलेल्या अपघातात मंगळवेढा येथील सायकलिस्ट सुहास ताड यांचे अपघाती निधन झाल्याने, त्यांना यावेळी सांगोला सायकलर्स क्लबच्यावतीने श्रध्दांजली वाहण्यात आली. यावेळी सांगोला क्लबचे सायकल लिस्ट व नागरिक उपस्थित होते.

सांगोला : जागतिक सायकलदिन प्रसंगी सांगोल्यातील सायकलपटु सायकल शर्यतीत प्रशिक्षक दिसत आहेत.

माढ्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध : ॲड. मीनल साठे

माढा/प्रतिनिधी

'आपले पसंतीचे ध्येय निश्चित करून त्यासाठी कठोर परिश्रम करण्याची तयारी ठेवल्यास यश नक्कीच मिळते. प्रियदर्शनी महिला विकास मंडळ यासाठी विद्यार्थी आणि पालकांच्या कायम सोबत राहील. महिलांसह समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कायम कटिबद्ध राहणार असल्याचा आशावाद मंडळाच्या अध्यक्षा तथा नगराध्यक्षा मीनल साठे यांनी दिला.

माढा, उपळाई खुर्द आणि बुद्रुक, मानेगाव, जामगाव, केवड, अंजनगाव, वडशिंगे, उंदरगाव, विठ्ठलवाडी, दारफळ, वेताळवाडी, खैराव वडाचीवाडी, चिंचोली, भूताष्टे, वाकाव, धानोरे आदी गावातील ३० हून अधिक माध्यमिक विद्यालयाच्या आणि ८ उच्च माध्यमिक विद्यालयाच्या १३५ गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा माढा नगरपंचायतच्या सहकार महर्षी गणपतराव साठे सभागृहात १ जून रोजी संपन्न झाला, यावेळी त्या बोलत होत्या.

माढा : प्रयदर्शनी महिला विकास मंडळ यासाठी विद्यार्थींचा सत्कार करताना नगराध्यक्षा मीनल साठे व आदी मान्यवर दिसत आहेत.

याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून काँग्रेसचे नेते दादासाहेब साठे यांनी आपल्या अपेक्षा मुलावर न लादता मुलाच्या आवडीने करिअर करण्याची संधी उपलब्ध करून देण्याचे आवाहन पालकांना केले. यावेळी प्रियदर्शनी महिला विकास मंडळाच्या माध्यमातून महिलांचा सर्वांगीण विकास करत असताना समाजाच्या गरजा कोरोनासारख्या नैसर्गिक आपत्तीप्रसंगी, पूरग्रस्त परिस्थितीत केलेल्या कामाची दाखल राज्यस्तरावर घेतली गेली. मंडळाच्या सर्व महिला सदस्याच्या मदतीने वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन यासारखे सामाजिक विधायक उपक्रम राबविण्यात मंडळ अग्रेसर असल्याचे गौरवोद्गार काढले. याप्रसंगी नवभारत विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक नागनाथ भुसारे यांनी माढा तालुक्याच्या शैक्षणिक विकासाची पायाभरणी सहकार महर्षी स्व. गणपतराव साठे यांनी केल्याने माढा व परिसरातील सर्वसामान्य घरातील विद्यार्थ्यांचा विकास झाल्याचे सांगितले. यावेळी नूतन पोलीस उपनिरीक्षक बिरुदेव खांडेकर अणि नूतन कृषी मंडळ अधिकारी राजेश पाटील यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक बिरुदेव खांडेकर यांनी संघर्षातून स्वतःला सिध्द करण्याची संधी मिळते, यामुळे ध्येय ठरवून संघर्षाला न घाबरता आत्मविश्वासाने सामोरे जाण्याचा सल्ला दिला.

कार्यक्रमासाठी माढा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील हेळकर, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, नगरसेवक अजिनाथ माळी, सभापती अरुण कदम, विकास साठे, नितीन साठे, नितीन साठे, वेदांत साठे, सुनीता राऊत, शबाना बागवान, वंदना लंकेश्वर, रेश्मा लंकेश्वर, मोहिनी नेटके, शिवाजी जगदाळे आदींसह विद्यार्थी व पालक उपस्थित होते. सूत्रसंचालन लक्ष्मण राऊत यांनी केले तर आभार समाधान लटके यांनी मानले.

पंढरपूर उपजिल्हा रुग्णालयात जागतिक तंबाखू नकार दिन साजरा

पंढरपूर/प्रतिनिधी

जागतिक तंबाखू नकार दिनाच्या अनुषंगाने उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर येथे जिल्हा परिषद कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे आणी उपविभागीय पोलीस अधीक्षक डॉ. अर्जुन भोसले यांच्या उपस्थितीत जागतिक तंबाखू नकार दिन साजरा करण्यात आला. ३१ मे हा दिवस जागतिक तंबाखू दिनाचे औचित्य साधून उपजिल्हा रुग्णालयात घेण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या वेळी तंबाखू सेवनामुळे शरीरास होणारे नुकसान आणि तोटे याबाबत माहिती देण्यात आली.

दरम्यान तंबाखूजन्य पदार्थ खाल्ल्याने शरीरास कशाप्रकारे हानी पोहोचवतात, तंबाखूमुळे होणारे दुष्परिणाम, तंबाखू सोडण्यासाठी करावयाचे उपाय तसेच व्यसनमुक्तीसाठी मार्गदर्शन इत्यादी विषयांवर सविस्तर समुपदेशन करण्यात आले. यावेळी सर्व उपस्थितांनी व्यसनमुक्तीची शपथ घेतली. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश सुडके यांच्या मार्गदर्शनाखाली व वैद्यकीय अधिकारी डॉ. केचे, डॉ. सरडे, डॉ. काणे, दंत शल्य चिकित्सक डॉ. भातलवंडे, डॉ. ऋचा वैद्य रुग्णालयीन अधिकारी कर्मचारी वर्ग यांच्या उपस्थितीत जागतिक तंबाखू नकार दिन संपन्न झाला. सदर कार्यक्रमास रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच रुग्णालयात आलेले रुग्ण उपस्थित होते.

पंढरपूर : जिल्हा परिषद कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे हे जागतिक तंबाखु निमित्त उपस्थितांना माहिती देताना.